# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.६ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २१८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 6 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 218 | Pages 4 | Rate 4 Rs


### सुनेत्रा पवार आज अर्ज भरणार

**मुंबई**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी राजकीय घडामोडींनी वेग घेतला आहे. सोमवार, ६ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख असून महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार आपला अर्ज दाखल करणार आहेत. एकीकडे महायुती ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्नशील असताना दुसरीकडे काँग्रेसने ॲड. आकाश विश्वनाथ मोरे यांना उमेदवारी जाहीर केली.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी रविवारी 'सिल्व्हर ओक' येथे शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी स्पष्ट केले की, अजितदादांच्या अपघाती निधनामुळे त्यांना श्रद्धांजली म्हणून आमचा पक्ष बारामतीची निवडणूक लढवणार नाही. आम्ही सुरुवातीलाच हा निर्णय घेतला होता आणि त्यावर आम्ही ठाम आहोत, असे शिंदे यांनी सांगितले. दरम्यान, राहुरी पोटनिवडणुकीबाबतही महाविकास आघाडीत चर्चा सुरू असून बाळासाहेब थोरात, हर्षवर्धन सपकाळ आणि शिवसेना (ठाकरे गट) यांच्याशी चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल, असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

# सर्वच पक्षांनी मन मोठे करून सुनेत्राताईंना पाठिंबा दिला पाहिजे-फडणवीसांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

बारामती विधानसभा मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणूक संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वच पक्षांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देण्याची मागणी केली आहे. सर्वच पक्षांनी मन मोठे करून त्यांना पाठिंबा द्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. यावेळी त्यांनी माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या पोटनिवडणुकीची आठवण काढत, ती निवडणूक देखील बिनविरोध केली असल्याचे सांगितले.या संदर्भात माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, सर्वच पक्षांनी सुनेत्रा ताईंना पाठिंबा दिला पाहिजे. माझी अशी सर्वांना विनंती असेल की, ही पोटनिवडणूक बिनविरोध झाली तर महाराष्ट्राला साजेशी अशा पद्धतीने परिस्थित होईल. यापूर्वी अनेक वेळा महाराष्ट्राने बिनविरोध पोटनिवडणूक केलेली आहे. मला आठवतं की, ज्या वेळेस आर. आर. आबांचे दुःखद निधन झालं होतं. त्यावेळी आपण पोटनिवडणूक बिनविरोध केली होती. भाजपने ठरवले होते की, निवडणूक लढणार नाही. त्यामुळे सर्वच पक्षांनी मन मोठे करून बिनविरोध निवडणूक करायला हवी, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



### सुनेत्रा पवारांनी शिवसेनेचा पाठिंबा मागितला

या निवडणुकीत सुनेत्रा पवार मैदानात उतरण्याची तयारी करत आहेत. त्यांनी याआधी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देऊन उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. आता आमदारकीसाठी त्या बारामतीतून निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क साधल्याचे समोर आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या फोन संभाषणात सुनेत्रा पवार यांनी बारामती पोटनिवडणुकीसाठी शिवसेनेचा पाठिंबा मागितला आहे. तसेच ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठीही त्यांनी चर्चा केल्याची माहिती पुढे येत आहे.

## जुन्या वादातून आनेगाव येथे दाम्पत्यावर जीवघेणा हल्ला; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जुन्या वादाचे पर्यावसान हाणामारीत होऊन एका दाम्पत्याला लाठ्या काठ्या,केबलची वायर आणि दगडाने बेदम मारहाण केल्याची घटना केज तालुक्यातील आनेगाव शिवारात घडली आहे.याप्रकरणी युसूफ वडगाव पोलीस ठाण्यात सहा जणां विरुद्ध विविध कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहिती नुसार,फिर्यादी विजयकुमार उत्तमराव कुलकर्णी वय ५९,रा. आनेगाव हे दि.३ एप्रिल रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास शेतात पाणी देण्यासाठी आपल्या दुचाकीवरून जात होते.यावेळी पांढरी नावाच्या शिवारात आरोपींनी त्यांची दुचाकी अडवली.तुम्ही आमच्या विरुद्ध तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनला का गेलात? असा जाब विचारत आरोपींनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

**दगड आणि केबलने मारहाण**

हा वाद विकोपाला गेल्यावर आरोपींनी विजयकुमार कुलकर्णी आणि त्यांची पत्नी सीमा यांना लाथाबुक्क्यांनी, हातातील केबलच्या वायरने आणि दगडाने मारहाण केली.यामध्ये कुलकर्णी यांच्या डोक्याला आणि हातापायाला गंभीर जखमा झाल्या आहेत, तर त्यांच्या पत्नीलाही जखमी करण्यात आले. मारहाण केल्यानंतर आरोपींनी त्यांना जिवे मारण्याची धमकी देऊन तेथून पळ काढला. जखमींवर सध्या अंबाजोगाई येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.




**सहा जणांवर गुन्हा**

याप्रकरणी विजयकुमार कुलकर्णी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी खालील आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तुकाराम त्रिंबक कोल्हे, कृष्णा तुकाराम कोल्हे दोघे रा.नायगाव,विक्रम परसराम हंडीबाग,वंदना विक्रम हंडीबाग,शोभा विठ्ठल हंडीबाग,रतन परसराम हंडीबाग सर्व रा.आनेगाव यांच्यावर युसूफवडगाव पोलिसांनी या घटनेची नोंद भारतीय न्याय संहिता (इछड) च्या कलम ११८(१), ११५(२), १२६(२), ३५२,३५१(२),१८९(२), १८९(४),१९० आणि १९१(२) नुसार फिर्याद दाखल केली आहे. पोलीस उपनिरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सीताराम डोंगरे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## केज पोलिसांचा कडक इशारा आंबेडकर जयंतीत डिजेला पूर्ण बंदी!

### शांतता समिती बैठकीत प्रशासनाचा निर्णय;नियम मोडणाऱ्यांवर थेट कारवाई

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर केज पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक उत्साहात पार पडली. जयंती उत्सव शांततेत, शिस्तीत आणि नियमांच्या चौकटीत साजरा करण्याचे आवाहन प्रशासनाने यावेळी केले.

सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेत DJ आणि कर्णकर्कश आवाजावर पूर्णपणे बंदी जाहीर करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन अनिवार्य असल्याचे स्पष्ट करत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनीही कायद्याची कडक अंमलबजावणी होणार असल्याचे सांगितले.




दरम्यान, केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा डॉ. सौ. सीताताई बनसोड यांनी शहरात स्वच्छता व मूलभूत सुविधांची हमी दिली. मिरवणूक मार्गावर विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच डॉ. हारुणभाई इनामदार यांनी जयंती निमित्त येणाऱ्या अनुयायांसाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीत जयंती काळात शहरात दारूबंदीची कडक अंमलबजावणी करण्याचा निर्णयही घेण्यात आला. सामाजिक सलोखा राखत, शांततेत आणि शिस्तीत जयंती साजरी करण्याचा निर्धार सर्व उपस्थितांनी व्यक्त केला.या बैठकीला स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऊसतोड महिलांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर-आ.मुंदडांचा ठाम आवाज

### अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रियांना आळा घालण्यासाठी पुणे बैठकीत महत्वपूर्ण शिफारशी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्याशी निगडित अत्यंत संवेदनशील प्रश्नाला गांभीर्याने हाताळत आ. नमिता मुंदडा यांनी अनावश्यक गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांना आळा घालण्यासाठी ठोस भूमिका मांडली आहे. पुणे येथे ४ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधत तातडीने प्रभावी धोरण राबविण्याची मागणी केली.

या बैठकीचे अध्यक्षस्थान डॉ. नीलम गोरे यांनी भूषवले होते. राज्यात वाढत्या अनावश्यक शस्त्रक्रियांवर नियंत्रण मिळवणे, ऊसतोड महिलांना सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, तसेच ग्रामीण भागात व्यापक जनजागृती करणे याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

आ. नमिता मुंदडा यांनी स्पष्टपणे नमूद केले की, महिलांचे आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नसून ती समाजाच्या सर्वांगीण विकासाशी जोडलेली आहे. प्रत्येक महिलेला सन्मानपूर्वक व आरोग्यदायी जीवन मिळणे हा तिचा मूलभूत हक्क असून, त्यासाठी शासनाने



ठोस आणि तातडीची पावले उचलणे अत्यावश्यक आहे.

या बैठकीत समितीमार्फत शासनाला काही महत्त्वपूर्ण शिफारशी सादर करण्यात आल्या. विशेषतः ऊसतोड महिलांच्या आरोग्याचे संरक्षण, अनावश्यक शस्त्रक्रियांवर कडक नियंत्रण आणि स्थानिक पातळीवरच गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीस अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे तज्ज्ञ, बीड जिल्हा रुग्णालयाचे अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. बीड जिल्ह्यात यापूर्वीही या विषयावर मोठा वादंग निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आणि आ. मुंदडा यांनी मांडलेली भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे.महिलांच्या आरोग्याबाबत कोणतीही तडजोड न करता त्यांना सुरक्षित व दर्जेदार आरोग्य सेवा मिळाव्यात, यासाठी या बैठकीत ठोस आराखडा तयार करण्यावर विशेष भर देण्यात आला.

## मैं संपूर्ण क्रांती चाहता हूँचा नारा आझाद क्रांती सेनेची अंतरवाली टेंभी येथे दमदार संघटन उभारणी

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

मैं संपूर्ण क्रांती चाहता हूँ या घोषवाक्याने प्रेरित होत आझाद क्रांती सेनेने जालना जिल्ह्यातील अंतरवाली टेंभी येथे आपली संघटनात्मक ताकद अधिक भक्कम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी शाखा रचना जाहीर करत सेनेने क्रांतिकारी विचारसरणीचा जोरदार संदेश दिला.

सेनाप्रमुख मा. राजेशजी घोडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली आणि जिल्हाप्रमुख दगडू घोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अंतरवाली टेंभी (ता. घनसावंगी, जि. जालना) येथे नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. या शाखेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन, युवक सक्षमीकरण आणि अन्यायाविरोधात लढा देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

शाखा प्रमुख म्हणून फारुक शेख यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी पांडुरंग पाटोळे, सचिवपदी बंडू खरात, सहसचिवपदी राधाकिसन पाटोळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खजिनदार म्हणून कैलास घोडे, कार्याध्यक्ष म्हणून करण कारके, संपर्क प्रमुख म्हणून गणेश



बर्डे तर संघटक म्हणून अहेमद शेख यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

प्रसिद्धी प्रमुख म्हणून सतीश पाटोळे, सल्लागार म्हणून लिंबाजी कांबळे आणि सोशल मीडिया प्रमुख म्हणून अखिल शेख यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सदस्य म्हणून राहुल वाघमारे, बाबासाहेब पाटोळे, कृष्णा पुरुळे, सुरेश पाटोळे, सचिन कारके, विलास घायतडक, वसीम सय्यद, साहिल शेख, प्रकाश पाटोळे आणि रफिक सय्यद यांचा समावेश करण्यात आला आहे.या नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून आझाद क्रांती सेना सामाजिक न्याय, पारदर्शक व्यवस्था आणि सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढा उभारणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. संपूर्ण क्रांतीच्या दिशेने एक मजबूत पाऊल म्हणून या शाखेकडे पाहिले जात असून, स्थानिक स्तरावर या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे. या वेळीअशोक ढगे, किसन भिसे सर, तुकाराम जाधव, नवनाथ लोखंडे यांची ही प्रामुख्याने उपस्थिती होती.

## श्री साकेश्वर महाराज यात्रा उत्सवानिमित्त साकत येथे रंगणार कुस्त्यांचा महासंग्राम

# श्री.चिराग मंगेश (दादा ) आजबे यांच्याकडून १ लाख ७१ रुपये प्रथम क्रमांकासाठी इनाम

दैनिक वादळ वार्ता

**जामखेड । प्रतिनिधी**

श्री साकेश्वर यात्रा उत्सवानिमित्त साकत येथे पारंपरिक कुस्त्यांचा भव्य आणि थरारक महासंग्राम रंगणार असून संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मंगळवार, दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता या जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत राज्यभरातील नामांकित तसेच स्थानिक पैलवान सहभागी होणार असून विविध गटांमध्ये चुरशीचे सामने रंगणार आहेत. प्रत्येक गटासाठी आकर्षक बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली असून प्रथम क्रमांकासाठी रोख रक्कम व चषक, तसेच इतर क्रमांकांसाठी मानचिन्हे आणि रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत.

यंदाच्या कुस्ती महोत्सवातील मुख्य आकर्षण म्हणजे मानाची कुस्ती ठरणार आहे.या लढतीत मुंबई महापौर केसरी विजेते पै. भारत मदने (बारामती) आणि महाराष्ट्र चॅम्पियन पै. गणेश जगताप (पुणे) हे दोन दिग्गज मल्ल आमनेसामने भिडणार आहेत.या दिग्गजांच्या लढतीकडे संपूर्ण कुस्तीप्रेमींचे लक्ष लागले आहे. या मानाच्या कुस्तीतील

विजेत्या पैलवानास प्रोत्साहनपर म्हणून युवा नेते श्री. चिराग मंगेश (दादा) आजबे यांच्या वतीने=ख तब्बल १ लाख ७१ रुपयांचे भव्य इनाम जाहीर करण्यात आले आहे. या मोठ्या इनामामुळे स्पर्धेची प्रतिष्ठा आणि रंगत लक्षणीयरीत्या वाढली असून सहभागी पैलवानांकडून सर्वोत्तम कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

श्री साकेश्वर यात्रा उत्सवानिमित्त साकत येथे आयोजित करण्यात आलेले निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान हे कुस्तीप्रेमींसाठी एक मोठी पर्वणी ठरणार असल्याची प्रतिक्रिया श्री .मंगेश (दादा) आजबे यांनी व्यक्त केली.

दैनिक लोकनेता शी बोलताना त्यांनी सांगितले की, मंगळवार दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता साकत येथे होणारे हे भव्य कुस्ती मैदान आपल्या ग्रामीण परंपरेचे, शौर्याचे आणि ताकदीचे प्रतीक आहे.

कुस्ती हा महाराष्ट्राचा अभिमानाचा खेळ असून अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील तरुणांना मोठी प्रेरणा मिळते. तसेच ग्रामीण क्रीडा संस्कृतीला नवे बळ प्राप्त होते. साकत येथील आयोजकांनी हा भव्य उपक्रम राबवून परिसरातील कुस्तीप्रेमींना एक संस्मरणीय पर्वणी उपलब्ध करून दिली आहे.या जंगी कुस्ती मैदानाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा आणि आपल्या परंपरेला अधिक बळ द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच सर्व आयोजकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

आयोजकांच्या वतीने परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भव्य कुस्ती महासंग्रामाचा आनंद घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे




# अजिंठा लेणीत मधमाशांचा पर्यटकांवर हल्ला सुरूच ;दोन महिन्यात ७० ते ८० पर्यटक जखमी

दैनिक वादळ वार्ता

**फर्दापूर । प्रतिनिधी**

फर्दापूर जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांमध्ये मधमाश्या दररोज पर्यटकांवर हल्ला करत राहतात.दररोज लेणी क्रमांक चार नऊ एकोणावीस सहविस जवळ बसलेल्या मधमाश्या पर्यटकांवर हल्ला करत आहेत. या दोनआठवड्यात आतापर्यंत किमान ७० ते ८० पर्यटक जखमी झाले आहेत. असेच दि.३ एप्रिल शुक्रवारी अजिंठा लेणी पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांवर मधमाशांनी हल्ला केल्याची घटना शुक्रवारी (दि.३) दोन वाजेच्या सुमारास अजिंठा लेणीतील लेणी क्रमांक २६ जवळ घडली होती.मधमाशांनी चावा घेतल्याने सहलीच्या विद्यार्थ्यांसह ३५ ते ४० पर्यटक जखमी झाले होते,.अजिंठा लेणीत दि.३ एप्रिल शुक्रवारी सकाळपासून मोठ्या प्रमाणात पर्यटक आले होते. दुपारपर्यंत सर्व काही नेहमी प्रमाणे सुरळीत सतू



असताना दोन वाजेच्या सुमारास लेणी क्रमांक ४,९,१९,२६ जवळील आग्या मोहळाच्या मधमाशांनी अचानक लेणीत आलेल्या पर्यटकांवर हल्ला केला. या अचानकहल्ल्याने लेणीत आलेल्या पर्यटकांत एकच धावपळ उडाली होती. अजिंठा लेणीतील लेणी क्र. चार, नऊ, एकोणावीस व सव्वीसजवळ आग्या मोहळाचे पोळे आहेत. दोनआठवडे पासून या पोळ्यातील मधमाशांनी पर्यटकांवर हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत. भारतीय पुरातत्त्व विभागाने अद्यापपर्यंत येथील आग्या मोहळाचे पोळे हटविण्यासाठी कोणतीही उपाययोजना न केल्याने पर्यटकांमधून नाराजी व्यक्त होताना दिसत आहे.

**अधिकाऱ्यावर कारवाई करावी. पर्यटकांची मागणी**

जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांना भेट देण्यासाठी आलेल्या देशी-विदेशी पर्यटकांवर मधमाश्यांनी अचानक हल्ला केलीची घटना होत आहे. हा घटना जवळजवळ दोन आठवड्या पासून सुरू आहे.लेणी क्रमांक ४,९,१९,२६ जवळ दररोज मधमाश्या देशी-विदेशी पर्यटकांवर हल्ला करत आहेत. दररोज अनेक पर्यटक जखमी होत आहेत. हे सर्व असूनही, अजिंठा लेण्यांमध्ये या मधमाश्यांच्या पोळ्यांसाठी कोणतीही व्यवस्था केली नाही.भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे अधिकारी मनोज पवार हे या प्रकरणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येतेएखाद्याच्या मृत्यूनंतरच हा अधिकारी जागे होईल का? वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आणि पर्यटकांशी खेळणाऱ्या स्थानिक अधिकाऱ्यावर कारवाई करावी. अशी मागणी पर्यटकांकडून केली जात आहे

## हिमायतनगर येथे शिवस्मारकासाठी मुन्ना शिंदे यांचे आमरण उपोषण;'हिंदवी स्वराज्य' संघटनेचा जाहीर पाठिंबा

दैनिक वादळ वार्ता

**हिमायतनगर । प्रतिनिधी**

हिमायतनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य शिवस्मारकाच्या जागेसाठी मुन्ना शिंदे यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाला आता सर्वस्तरातून पाठिंबा मिळत असून, 'हिंदवी स्वराज्य' या प्रगतिशील विचारांच्या अराजकीय सामाजिक संघटनेने आपला जाहीर पाठिंबा घोषित केला आहे.

या संदर्भात संघटनेच्या वतीने अधिकृत पत्र निर्गमित करण्यात आले असून, त्यात मुन्ना शिंदे यांच्या मागणीला न्याय मिळावा अशी भूमिका मांडण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांचे आराध्य दैवत असून, त्यांच्या स्मारकासाठी सुरू असलेले हे आंदोलन लोकशाही मार्गाने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे हिंदवी स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव जाधव पाटील हरडफकर या उपोषणाला पूर्णतः पाठिंबा देत आहे, असे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.



या पाठिंबा पत्रावर हिंदवी स्वराज्य संघटनेचे तालुका अध्यक्ष योगेश पाटील खडकीकर, भीमराव मनमदे, आणि अमोल शिंदे (धारापूर) यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

शिवस्मारकाच्या जागेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुन्ना शिंदे यांनी पुकारलेल्या या उपोषणाला आता समाजातील विविध घटकांकडून बळ मिळत असल्याने, प्रशासन यावर काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


## लामजना पाटी बसस्थानकात प्रवाशांची सुरक्षा राम भरोसे!

# शालेय विद्यार्थी ,महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बस स्थानकात सीसीटीव्ही कॅमेरे व पोलीस चौकीची मागणी!

दैनिक वादळ वार्ता

**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील लामजनापाटी येथील बस स्थानक हे एक अत्यंत महत्वाचे बस स्थानक असून लातूर, सोलापूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर या लांब पल्ल्यांच्या गाड्यांसह येथून भारतभर जाण्यासाठी दररोज अनेक राज्य व आंतरराज्य गाड्या धावतात त्यामुळे येथून अनेक प्रवाशी प्रवास करतात. बसस्थानकातील पथदिवे बंद असल्यामुळे रात्री प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी चोरी होण्याची भिती व्यक्त केली असून अनेक अडचणींचा त्यांना सामना करावा लागत आहे. बस स्थानकात खूप मोठ्या प्रमाणावर त्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना व आवश्यक ती छताची दुरुस्ती करणे गरजेचे आहे.स्थानकात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी व महिला तथा शालेय विद्यार्थी - विद्यार्थीनीनींच्या सुरक्षेसाठी गेल्या कित्येक दिवसापासून सीसीटीव्ही कॅमेरे बसण्याची मागणी केली जात आहे. बस



स्थानकातून दररोज हजारो शालेय विद्यार्थी व महिला, प्रवाशी प्रवास करत असतात पण यांच्या सुरक्षेसाठी बसस्थानकामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे व पोलीस चौकी नसल्याने शालेय विद्यार्थी व महिला तथा इतर प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर असून महामंडळांशी अनेकवेळा स्थानिक नागरिक तथा प्रवाशांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे व पोलीस चौकीची मागणी करूनही या मागणीकडे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे.

एकीकडे सरकार महिला सुरक्षा व शालेय विद्यार्थिनी यांच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध असल्याच बोलले जाते पण स्थानकात मात्र विद्यार्थी व महिलांची सुरक्षा होत नसल्याने त्याचा नाहक त्रास अनेक प्रवाशांना करावा लागत आहे.तरी लामजना बसस्थानक येथे लवकरात लवकर सीसीटिव्ही कॅमेरे बसवावेत व महिला व विद्यार्थीनीच्या सुरक्षीत प्रवासासाठी पोलीस चौकी उभारण्यात यावी अशी मागनी प्रवाशातुन केली जातेय

# AWPL च्या वतिने उमरी येथे आयुर्वेदिक आरोग्य शिबीर संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**उमरी । प्रतिनिधी**

दि ४ एप्रिल २६ रोजी ठिक १२ वाजता व्यंकटेश नगर उमरी ता उमरी जि नांदेड येथे -थझङ च्या वतिने आयुर्वेदिक आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. तेंव्हा सदर आरोग्य शिबीरामध्ये लकवा, गुडघे दुखी, कंबर दुखी, थायरॉईड, शुगर, बि पी, हार्ट अँटैक, डोळ्यांचे आजार लठ्ठपणा वजन कमी, पोटांची समस्या, इत्यादी आजारांचे रोगी उपस्थित होते. मा अनिल कुमार यादव सर, स्टार सफायर पुणे, यांनी संबंधित महिला व पुरुषांना आयुर्वेदिक औषधी सेवन करून आरोग्य मुक्त जीवन जगावे असा सल्ला दिला आहे.

सदरील आरोग्य शिबीरात किशनदादा गायकवाड, गोविंद पाटील ढगे सर, बळीराम जाधव सर, शिवाजी पाटील भोसले, तानाजी भोसले, पोलिस जमादार उमरी, विशाल भोसले, शंकर कस्तुरे, सागरबाई रामसिंग राठोड, वसंत थावरू राठोड, शेख जीनत आली, कैलास बळीराम जाधव, नामदेव रघुनाथ चव्हाण, सुनील देवकर, रविंद्र गायकवाड कुदळेकर इत्यादी बहुसंख्य महिला पुरुष उपस्थित होते.



**दि. ०४/०४/२०२६ रोजी किशनदादा गायकवाड सर यांच्या उमरी येथिल निवासस्थानी रुश्रि चे महागुरू श्री. अनिल कुमार यादव सर (स्टार सफायर) मार्गदर्शन करताना...**

## जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर 'किनवट'च्या विद्यार्थ्यांची गगनभरारी

# डॉ.श्वेता जायभाये,डॉ.अश्विनी गुट्टे,डॉ.पद्मश्री दराडे,डॉ.अनिरुद्ध फड, डॉ.अभिजित कराड यांचे 'डॉक्टर' होण्याचे स्वप्न पूर्ण

दैनिक वादळ वार्ता

**किनवट । प्रतिनिधी**

संकटांशी दोन हात करत, जिद्द आणि मेहनतीच्या बळावर अशक्य गोष्टी शक्य करता येतात, हे आदिवासी बहुल भागातील ध्येयवेड्या तरुणांनी सिद्ध करून दाखवले आहे. किनवट येथील ज्येष्ठ पत्रकार तथा 'साप्ताहिक वंजारी पुकार'चे मुख्य संपादक दत्ता जायभाये यांची कन्या डॉ.श्वेता वनिता दत्ता जायभाये, डॉ.आश्विनी रेखा बालाजी गुट्टे, डॉ.पद्मश्री सिंधू प्रल्हाद दराडे, डॉ.अभिजीत मिराबाई संजय कराड, डॉ.अनिरूद्र गयाबाई केशव फड यांनी वैद्यकीय क्षेत्रातील कठीण मानली जाणारी चइइड ही पदवी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. नुकताच पुणे येथील प्रसिद्ध श्रीमती काशिबाई नवले मेडिकल कॉलेजमध्ये यांचा दिमाखदार पदवी प्रदान सोहळा संपन्न झाला.

परिस्थितीवर मात करत मिळवले यशग्रामीण आणि दुर्गम भागातून येऊन पुण्यासारख्या शैक्षणिक केंद्रात स्वतःचे स्थान निर्माण करणे हे या विद्यार्थ्यांसाठी मोठे आव्हान होते. मात्र, लहानपणापासूनच अभ्यासात हुशार असलेल्या विद्यार्थ्यांनी'डॉक्टर' होण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. वैद्यकीय शिक्षणाचा खडतर प्रवास, अहोरात्र घेतलेली मेहनत आणि आई-वडिलांच्या खंबीर पाठिंब्यामुळे यांनी हे यश संपादन केले आहे. २८ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या पदवी दान सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली, तेव्हा उपस्थित सर्वांनी यांचे टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी प्रवासहे यश केवळ यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी आहे. कोणतेही क्षेत्र कठीण नसते, गरज असते ती केवळ चिकाटीची आणि प्रामाणिक प्रयत्नांची, असा संदेश यांच्या या यशातून मिळतो. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न मांडणाऱ्या वडिलांच्या संस्कारातून श्वेतानेही आता रुग्णसेवेचा वसा घेतला आहे.संपादक दत्ता जायभाये यांच्या कन्येने व सदर विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या उत्तुंग यशामुळे किनवट-माहूर परिसरासह संपूर्ण जिल्ह्याचे नाव उज्ज्वल झाले आहे. या यशाबद्दल राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी श्वेता सह सर्व यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला असून, त्यांच्या पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


**मुलांनी पाहिलेले स्वप्न आज सत्यात उतरले आहे, याचा अभिमान वाटतो. ग्रामीण भागातील मुलांनी जिद्द सोडली नाही तर ते कोणत्याही शिखरावर पोहोचू शकतात, हेच श्वेताने व सर्वांनी दाखवून दिले.**

**- दत्ता जायभाये**

**(मुख्य संपादक, साप्ताहिक वंजारी पुकार)**



# आ.नारायण आबा पाटील यांच्या नेतृत्वाखाली दहिगाव उपसा आवर्तनाचे तीन महिने पूर्ण



दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार नारायण आबा पाटील यांच्या कार्यतत्परतेमुळे चालू असलेल्या दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या आवर्तनास आज तीन महिने पूर्ण झाले आहेत. गेल्या तीन महिन्यांपासून काही तांत्रिक कारणांमुळे आलेले अडथळे वगळता सलग तीन महिने आवर्तन चालू असल्याने करमाळा तालुक्यातील पुर्व भागात पिकांना वरदान मिळाले आहे. तसेच अनेक ठिकाणी जनावरांच्या पिण्याची व चाऱ्याची काही कालावधी साठी तरी सोय निर्माण झाली आहे. दहिगाव उपसा सिंचन योजनेचे चालू आवर्तन हे दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी सरपंच पृथ्वीराज पाटील यांच्या शुभहस्ते सुरू करण्यात आले होते. यानंतर या आवर्तनात नेरले, वरकुटे, घोटी, मलवडी चारी, केम चारी, निंभोरे, कोंढेज, लव्हे, सौंदे, वरकटणे, सरफडोह, शेलगाव (क), अर्जूननगर शिवार, फिसरे शिवारातील काही ओढे व बंधारे, गुरसळी, देवळाली, खडकेवाडी, कुंभेज, जेऊर, हजारवाडी, जेऊरवाडी आदि ठिकाणच्या पाणी साठ्यात पाणी उपलब्ध करून देण्यात आले. अगदी जानेवारी महिन्यात हे आवर्तन सुरू केले असल्याने त्यावेळी काही ठिकाणी पिकांच्या अडचणी असल्याने शेतकऱ्यांनी स्वतः हुन पाणी उपलब्ध असताना घेतले नाही. परंतु नंतर ऊसा सारखी पिके काढली गेल्यामुळे परत या भागात पाणी दिले गेले आहे. तर काही ठिकाणी बंदिस्त पाईपलाईन काम चालू असल्याने पाणी देण्यात तांत्रिक कारणांमुळे अडचणी आल्या आहेत. अन्यथा बहुतांश ठिकाणी या तीन महिन्यांत पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच अजुनही मलवडी चारी, घोटी शिवारातील काही तलाव, शेलगाव परिसरातील काही बंधारे, पांडे ओढा, झरे व पोफळज तलाव आदि ठिकाणच्या पाणी साठ्यात पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार नारायण आबा पाटील यांच्या कडे आलेली असुन या ठिकाणी पाणी पोहोच करण्यासाठी पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी अहोरात्र मेहनत घेत असल्याचे पाटील गटाचे प्रवक्ते सूनील तळेकर यांनी सांगितले. तसेच अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की तीन महिने आवर्तन सुरू असल्याने उजनी जलपात्रातील शेवाळ हे मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक पंप, बंदिस्त पाईप व डिसी चेंबर या मध्ये जमा होत आहे. तसेच कुंभेज येथील पंप हाऊस दोन समोरील पाणी साठवण भागात उजनीतील शेवाळ व प्लॅस्टिक व कचरा मोठ्या प्रमाणात जमा होऊन पंप हाऊस दोन मधील पंप चालवताना तांत्रिक खंड पडत आहे. यावर पाटबंधारे विभाग युध्दपातळीवर नियोजन करुन अडथळा कमी प्रमाणात आणण्याचे प्रयत्न करत आहेत. तीन महिने अविरतपणे पंप चालू असल्याने उजनीतुन पाणी उपसण्याची क्षमता अर्थात पाणी डिस्चार्ज कमी झाल्याने पाण्याचा विसर्ग कमी झाला आहे. यामुळे मुख्य कॅनाल मधील पाणी प्रवाह मंदावल्याने नियोजित ठिकाणी पाणी पोहचण्यास वेळ लागत आहे.तरी उर्वरित ठिकाणी पाणी पोहचण्यासाठी मुख्य कॅनाल वरील इलेक्ट्रिक मोटार व सायफन द्वारे पाणी घेणाऱ्या शेतकऱ्यांनी काही काळ पाणी न घेता प्रवाहास पुढे जाऊ दिले तर मलवडी व घोटी येथील ठिकाणी पाणी पोहोच होईल. आमदार नारायण आबा पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाली व पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या नियोजनातुन सलग तीन महिने हे आवर्तन चालू असुन सलग तीन महिने आवर्तन चालू ठेवण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे तळेकर यांनी सांगितले. तसेच दहिगाव उपसा सिंचन योजना ही आमदार नारायण आबा पाटील यांच्या कालावधीत पुर्ण क्षमतेने चालू असुन उर्वरित ठिकाणी पाणी देण्यासाठी प्रयत्न राहतील असेही सांगण्यात आले.

## रावगावच्या सुपुत्राची केंद्रप्रमुखपदी झेप पुणे गुणवत्ता यादीत अशोक फुंदे चमकले



दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

जिद्द, चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर शून्यातून विश्व निर्माण करता येते, याचा प्रत्यय रावगावच्या सुपुत्राने दिला आहे. येथील पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालयाचे माजी विद्यार्थी अशोक फुंदे यांनी स्पर्धा परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करत केंद्रप्रमुख पदाला गवसणी घातली आहे तसेच पुणे जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीतही मानाचे स्थान पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.यशाचे शिखर सर केल्यानंतर अशोक फुंदे यांनी सर्वात आधी आपल्या शाळेला भेट दिली. ज्या शाळेने संस्काराची शिदोरी दिली, त्या गुरुजनांचे आशीर्वाद घेण्यासाठी ते विद्यालयात पोहचले. आपल्या लाडक्या विद्यार्थ्याला उच्च पदावर विराजमान झालेले पाहून शिक्षकांचे डोळेही कौतुकाने पाणावले होते.या गौरवशाली यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रावगावचे मा. सरपंच विलास बरडे, शहाजी बापू करगळ आणि पालक प्रतिनिधी शिवाजी पाडुळे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते श्री. फुंदे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित गौरव करण्यात आला.यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की ध्येय निश्चित करून सातत्याने आणि प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास कोणतेही यश अशक्य नाही. माझ्या यशाचा पाया याच शाळेत रचला गेला असून, याचे सर्व श्रेय माझ्या पालकांना, शिक्षकांना आणि शाळेतील संस्कारांना जाते.

## शंकरपूर येथे पिण्याचे पाण्याची विहीर बनली धोकादायक

दैनिक वादळ वार्ता
**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यात मौजा शंकरपूर येथील कानपा रोड लगत गोड्या पाण्याची वीहीर आहे. या विहिरीवर वार्ड नंबर एक मधील संपूर्ण नागरिक वर्षभर पिण्याचे पाणी घेत असतात. परंतु या दोन वर्षे आधी विहिरीच्या जवळच देशीभट्टी आणि बियर बार झाल्याने आणि या राज्य मार्गाचे रुंदीकरण झाल्याने हे रुंदीकरण विहिरीला टेकले त्यामुळे अपघात होण्याच्या दृष्टीने या विहिरीचे पाणी भरणे वार्डातील नागरिकांनी बंद केले. सदर रुंदीकरणामुळे रस्त्याच्या कडेला असलेली जुनी विहीर सध्या अत्यंत धोकादायक स्थितीत अगदी रस्त्याच्या काठावर असल्याने व सायंकाळच्या वेळेला बाहेरगाव वरून येणारे मध्य पिणाऱ्यांच्या जीवाला तसेच मद्य पिऊन गाडी चालवणाऱ्या या जीवाला धोका



होऊ शकतो.ही विहीर कोणत्याही प्रकारच्या सुरक्षा व्यवस्थेशिवाय उघडी असल्यामुळे तसेच विहिरीच्या दुसऱ्या बाजूला देशी भट्टी व बार असल्याने आणि या रोडवर दिवसभर जड वाहनांची मोठी वर्दळ असल्याने कोणत्याही शनि मोठा अपघात होणार हे नाकारता येत नाही. त्यामुळे वाहनचालक, पादचारी तसेच शालेय विद्यार्थी यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात अपघात होण्याची शक्यता अधिक आहे. सदर बाबीची तात्काळ दखल घेऊन संबंधित विहिरीची योग्य ती विल्हेवाट लावावी अथवा मजबूत संरक्षण भिंत/जाळी/रेलिंग उभारून सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. जर या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष झाले व कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, तर शंकरपूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री. अशोक ज्ञानेश्वर चौधरी हे गावकऱ्यांसह आपल्या विभागाच्या कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन करण्यास बाध्य होतील, असा इशारा शंकरपूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच अशोक चौधरी यांनी उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चिमूर यांना निवेदना मधून दिली आहे. आणि या निवेदनानंतर दुर्घटना घडल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील असेही निवेदनात नमूद केले आहे.

## बाहे येथे हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरण

दैनिक वादळ वार्ता
**रोहा । प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावामध्ये सालाबादप्रमाणे यंदाही १ व २ एप्रिल रोजी श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण गाव परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. या सोहळ्यास रायगडभूषण हभप डॉ. मारुती महाराज कोलाटकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. १ एप्रिल रोजी हरिपाठाने कार्यक्रमांची सुरुवात झाली. त्यानंतर हभप डॉ. हरिदास महाराज पालवे शास्त्री (आळंदी) यांच्या हरिकीर्तनरूपी सेवेमुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.



रात्री भव्य काठी मिरवणूक सोहळ्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

२ एप्रिल रोजी पहाटे श्री हनुमान जन्म सोहळा व अभिषेक विधी पार पडले. त्यानंतर श्री सत्यनारायण महापूजा संपन्न झाली. दिवसभर पालखी सोहळ्याने गावात भक्तीमय वातावरण निर्माण केले. रात्री महाप्रसादाने सोहळ्याची सांगता करण्यात आली.यावेळी प्रवचनात बोलताना हभप डॉ. हरिदास महाराज पालवे शास्त्री यांनी हिंदू ही केवळ धर्माची संकल्पना नसून ती एक जीवनपद्धती असल्याचे सांगितले. तसेच मातृभाषा ही आपली सांस्कृतिक ओळख आणि वैभवाचा ठेवा असून तिचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.या दोन दिवसांच्या धार्मिक सोहळयात गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला असून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## रोह्यात हनुमान जन्मोत्सव उत्साहात मान्यवरांच्या उपस्थितीत भक्तिमय सोहळा

दैनिक वादळ वार्ता
**रोहा । प्रतिनिधी**

रोहा शहरातील प्रसिद्ध राम-मारुती चौकातील पुरातन तसेच नव्याने आकर्षक स्वरूपात उभारण्यात आलेल्या श्री हनुमान मंदिरात यंदाचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरा करण्यात आला. विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे परिसरात दिवसभर उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.या सोहळ्यास राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, युवक नेते तथा माजी आमदार अनिकेत तटकरे, तसेच नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी उपस्थिती लावली. यावेळी मारुती मंदिर ट्रस्टचे विश्वस्त आनंद कुळकर्णी,



मोतीलाल जैन व अरुण करंबे यांनी मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.तसेच माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, उपाध्यक्ष अहमद दर्जी, गटनेते महेंद्र गुजर, सभापती, नगरसेवक आदींसह अनेक मान्यवर व भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.मंदिर परिसर रंगीबेरंगी फुलांच्या माळांनी सजविण्यात आला होता. आकर्षक रांगोळ्या आणि विद्युत रोषणाईमुळे परिसर अधिकच खुलून दिसत होता. लाऊडस्पीकरवर सुरू असलेल्या भक्तिगीतांनी वातावरण अधिकच प्रसन्न व भक्तिमय झाले होते.कार्यक्रमाचे आयोजन मारुती मंदिर ट्रस्ट तसेच स्थानिक कार्यकर्त्यांनी केले होते. पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय देसाई, दिलीप पवार, चिंतामणी लोहकरे, सानिनकुमार पी. व्ही. यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पहाटेपासूनच भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी उसळली होती, जी रात्री उशिरापर्यंत कायम होती.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी हभप सुषमा माधव भावे यांच्या कीर्तनाने झाली. दिवसभर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी हभप मंदार माधव भावे यांच्या 'भक्तिसंध्या' या भावगीतांच्या कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाला श्वेता आठवले, सायली बापट, आनंद सहस्त्रबुध्ये व सुयोग कोनकर यांनी साथ दिली. रात्री रणजित देशमुख (अंधारआळी) यांच्या कीर्तनाने सोहळ्याची सांगता करण्यात आली.

संपूर्ण दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांनी भरलेला हा उत्सव भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे अत्यंत [illegible]

## गोळवाडीत हनुमान जन्मोत्सव भक्तीमय वातावरणात प्रवचनातून मिळाला श्रद्धा व नम्रतेचा संदेश

दैनिक वादळ वार्ता
**वैजापूर । प्रतिनिधी**

श्री हनुमान जयंतीनिमित्त गोळवाडी येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात अत्यंत भक्तीमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पहाटे काकड आरतीने उत्सवाची मंगल सुरुवात झाली. त्यानंतर बजरंग बलींचा विधीवत अभिषेक करण्यात आला. मंत्रोच्चार आणि भजनांच्या गजरात मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. सकाळपासूनच भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली होती. दर्शनासाठी रांगा लागल्या असून प्रत्येक भक्ताने श्रद्धेने हनुमानाचे दर्शन घेतले. दिवसभर मंदिरात धार्मिक वातावरण कायम राहिले. यावेळी सायंकाळी ६ ते ७ यावेळी ह.भ.प. दादासाहेब महाराज रंजाळे यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले होते. आपल्या प्रभावी प्रवचनातून त्यांनी महाभारतातील एक प्रेरणादायी प्रसंग सांगत भक्तांना श्रद्धा, नम्रता आणि ईश्वरभक्तीचा संदेश दिला. महाराजांनी सांगितले की, महाभारताच्या युद्धावेळी अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर महारुद्र हनुमंत विराजमान होते आणि



भगवान श्रीकृष्ण अर्जुनाचे सारथी म्हणून कार्य करत होते. युद्धादरम्यान प्रत्येक वेळी श्रीकृष्ण प्रथम रथावरून उतरायचे, मात्र युद्ध समाप्तीनंतर त्यांनी अर्जुनाला प्रथम उतरायला सांगितले. त्यामागील कारण स्पष्ट करताना श्रीकृष्ण म्हणाले की, हा रथ अनेक महान योद्ध्यांच्या-भीष्माचार्य व द्रोणाचार्य यांच्या-बाणांनी विदीर्ण झाला होता, परंतु ध्वजावर विराजमान असलेल्या हनुमंताच्या कृपेने तो सुरक्षित राहिला होता. श्रीकृष्ण खाली उतरल्यानंतर हनुमंत निघताच क्षणार्धात रथ जळून खाक झाला. या प्रसंगातून अहंकार टाळून ईश्वरावर विश्वास ठेवण्याचा संदेश महाराजांनी दिला. या प्रवचनाचा लाभ घेण्यासाठी लसूर सर्कलचे नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य सुभाष काका तांबे तसेच पंचायत समिती सदस्य राहुल पाटील शेळके यांनीही उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतला. प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी महाराजांचे पूजन करून आशीर्वाद घेतले. मा. सरपंच श्री. किरण पा. पगार व मित्रमंडळाच्या वतीने सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने उपस्थितांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या धार्मिक कार्यक्रमामुळे गोळवाडी गावात भक्तीभाव, एकोपा आणि श्रद्धेचे सुंदर वातावरण निर्माण झाले. हनुमान जन्मोत्सव निमित्त संपूर्ण गावात दिवसभर भक्तिरसाचा दरवळ पसरला होता.

## आठवडी बाजारात भाजीपाला उत्पादकांना 'हक्काचे गाढे'; मध्यरात्रीची दलाली बंद, लिलाव वेळेत बदल

दैनिक वादळ वार्ता
**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

मध्यरात्री होणारी भाजीपाल्याची दलाली बंद करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय धामणगाव नगरपरिषदेने घेतला आहे. नगराध्यक्ष डॉ. अर्चनाताई अडसड-रोठे यांच्या पुढाकारातून रविवारी आठवडी बाजारात ४० हक्काचे गाढे भाजीपाला उत्पादक शेतकरी व व्यापाऱ्यांना लिलावातून देण्यात आले. या निर्णयामागे आमदार प्रतापदादा अडसड यांचे मार्गदर्शन लाभले.गेल्या पाच वर्षांपासून भाजीपाल्याची दलाली मध्यरात्री ३ ते ४ वाजताच्या दरम्यान होत असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. दलाली प्रक्रिया एकाच ठिकाणी न होता विखुरलेल्या स्वरूपात होत असल्याने शेतकऱ्यांना आपला माल बाजारात आणणे कठीण जात होते. परिणामी अनेकांनी भाजीपाला उत्पादन कमी केले होते, तर या परिस्थितीचा फायदा बाहेरील मोठ्या व्यापाऱ्यांना होत होता.

या पार्श्वभूमीवर भाजीपाला उत्पादकांनी आमदार प्रतापदादा अडसड यांच्या जनता दरबारात



आपली व्यथा मांडली होती. तसेच नगराध्यक्ष डॉ. अर्चनाताई अडसड-रोठे यांचीही भेट घेतल्यानंतर तात्काळ तोडगा काढण्यात आला. कॉटन मार्केट परिसरात नगरपरिषदेच्या वतीने ४० गाढ्यांचा लिलाव करून ते भाजीपाला उत्पादक व व्यापाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आले. यासोबतच दलालीची वेळ मध्यरात्रीऐवजी सकाळी करण्यात आली आहे.या लिलावप्रसंगी नगराध्यक्ष डॉ. अर्चनाताई अडसड-रोठे, उपाध्यक्ष गिरीष मुंदडा, पाणीपुरवठा सभापती विलास बुटले, नगरसेवक दर्शन राठी, जगदीश रॉय, काजल उपरीकर, अंशुल बडगया, अंजली मारवे, सीमा पेंदाम, प्रियंका जंवजाळ तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### शेतकऱ्यांचा समाधानाचा सूर

**मध्यरात्री होणारी दलाली व जागेअभावी निर्माण होणाऱ्या अडचणीमुळे अनेक शेतकरी बाजारापासून दूर राहत होते. मात्र आता हक्काचे गाढे व सकाळची लिलाव वेळ मिळाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयाबद्दल भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांनी आमदार प्रतापदादा अडसड व नगराध्यक्ष डॉ. अर्चनाताई अडसड-रोठे यांचे आभार मानले आहेत.**

# क्षणभराच्या निष्काळजीपणाने अपघात एसटीची दोन कारना जोरदार धडक!

## केज–अंबाजोगाई रस्त्यावर थरारक घटना; तिघे जखमी, मोठा अनर्थ टळला

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज–अंबाजोगाई मार्गावर रविवारी (दि. ५) दुपारी पावणे दोन वाजण्याच्या सुमारास पिसेगाव पाटीजवळील पेट्रोल पंपासमोर भीषण अपघात घडला. समोरच्या वाहनाने अचानक वळण घेतल्याने मागील वाहनांनी वेग कमी करताच भरधाव एसटी बसने दोन कारना पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात तिघे जखमी झाले असून बसमधील प्रवासी मात्र सुखरूप बचावले.

मिळालेल्या माहितीनुसार, दत्ता लांडगे (रा. केज) हे आपल्या कारने (एम.एच. ०६ बीएम १६८२) प्रवास करत होते. त्यांच्या मागोमाग विनोद जगताप व सनी गायकवाड (दोघे रा. कळंब) हे दुसऱ्या कारने (एम.एच. १२ जीआर ९०२२) येत होते. त्याचवेळी अंबाजोगाई–छत्रपती संभाजीनगर एसटी बस (एम.एच. ०९ एफएल १०२१) चालक मारुती फड व वाहक बालासाहेब नागिसे १४ प्रवाशांसह केजकडे येत होते.

दरम्यान, समोर असलेल्या कार चालकाने अचानक पेट्रोल पंपाकडे वळण्यासाठी इंडिकेटर दिल्याने पुढील दोन्ही कार चालकांनी गती कमी केली. मात्र मागून येणाऱ्या एसटी बसला अचानक ब्रेक लावण्यास कमी अंतर मिळाल्याने बसने दोन्ही कारना पाठीमागून धडक दिली. या धडकेत दत्ता लांडगे यांची कार रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात जाऊन पडली.

या अपघातात दत्ता लांडगे, विनोद जगताप व सनी गायकवाड हे तिघे जखमी झाले असून त्यांना मुक्कामार बसला आहे. दोन्ही कारचे मोठे नुकसान झाले आहे. बस चालकाने वेळेवर ब्रेक लावल्यामुळे बसचा वेग कमी झाला आणि मोठा अनर्थ टळला. बसमधील चालक, वाहक व सर्व प्रवासी सुखरूप असल्याची माहिती मिळाली आहे.

या घटनेमुळे काही काळ परिसरात खळबळ उडाली होती. रस्त्यावर वाहतूक सुरळीत करण्यासाठी स्थानिकांनी मदत केली. अपघाताचे नेमके कारण अचानक घेतलेले वळण व कमी अंतर असल्याचे समोर येत असून, वाहनचालकांनी अधिक दक्षता बाळगण्याची गरज व्यक्त केली जात आहे




# दिपक कांबळे यांच्या नेतृत्वाखाली केजमध्ये भव्य सामाजिक प्रबोधन पर्व

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रक्तदान,व्याख्यान व प्रबोधन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त केज शहरात दिपक भाऊ कांबळे युवा मंच यांच्या वतीने विविध सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रबोधन पर्वामध्ये रक्तदान शिबीर, फळवाटप, व्याख्यान आणि प्रबोधन कार्यक्रमांचा समावेश असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शुक्रवार, १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता उप जिल्हा रुग्णालय, केज येथे भव्य रक्तदान शिबीर व रुग्णांना फळवाटप कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. दत्तात्रय केंद्रे (अधीक्षक) व संदीप मांजरमे (सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक) यांच्या हस्ते होणार असून अनेक



मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

बुधवार, १५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता पंचायत समिती मैदान, केज येथे प्रसिद्ध व्याख्याते नितीन बानगुडे पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून विष्णू भाऊ घुले (माजी सभापती) उपस्थित राहणार असून अध्यक्षपदी दिपक भाऊ कांबळे राहतील.

गुरुवार, १६ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता पंचायत समिती मैदान येथे भीमशाहीर राहुलजी अन्वीकर यांचा प्रबोधनपर कार्यक्रम संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन पप्पूजी कागदे (प्रदेशाध्यक्ष, रिपाइं आठवले गट) यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी विष्णू भाऊ घुले राहतील.

या तीन दिवसीय प्रबोधन पर्वासाठी जिल्हाभरातून नागरिक, भीमसैनिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समिती व कार्यकर्ते परिश्रम घेत असून, केज व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अण्णाभाऊंचा पुतळा हाटवल्यास आम्ही सरकार हटवू आझाद क्रांती सेना

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

५ एप्रिल २०२६ रोजी खामगाव जिल्हा बुलढाणा येथे सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा प्रकरणी आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी भेट देऊन झालेला सर्व प्रकार समजून घेतला

याप्रसंगी सेना प्रमुख राजेश घोडे म्हणाले की सरकार जाणीवपूर्वक अण्णाभाऊ साठेंना तुझ्या भावाची वागणूक देत आहे खामगाव नगरपालिका, आमदार, व मंत्री, हे भाजपा चे असून गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत भाजपाची सत्ता आहे तेव्हा भाजपमंत्राच्या बापाचा पुतळा बसवायचा असल्याने अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांना विरोध मंत्र्याकडूनच होत आहे तेव्हा अण्णाभाऊंचा पुतळा हटवण्याचा प्रयत्न केल्यास महाराष्ट्रातील मातंग समाजासह इतर समाजाला सोबत घेऊन आम्ही भाजपा सरकार हटवून टाकू असे मत याप्रसंगी सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले. समाजाच्या वतीने नगरपालिका




हद्दीतील रेल्वे स्टेशनच्या शेजारील जागे मध्ये सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसवला असून गेल्या अनेक वर्षापासून अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाची मागणी समाजाच्या वतीने करण्यात येत आहे तेथील पुतळा नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून उचलण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने गेल्या पंधरा दिवसापासून समाजाच्या वतीने साखळी उपोषण करण्यात येत आहे. आज तेथे भेट देऊन खामगाव येथील सत्यशोधक अण्णाभाऊ यांच्या पुतळ्याला हार घालून आझाद क्रांती सेना या लढ्यामध्ये खंबीरपणाने उभा असल्याचा शब्द समाज बांधवांना देण्यात आला अण्णाभाऊंचा पुतळा हटवल्या सबंध महाराष्ट्र मध्ये आंदोलन उभा करण्याची शपथ आज या प्रसंगी घेण्यात आली. समवेत आझाद क्रांती सेना माजलगाव ता प्रमुख अशोक जी ढगे, आझाद क्रांती सेना ऊसतोड कामगार संघटना माजलगाव ता प्रमुख तुकाराम जाधव, नवनाथ लोखंडे, आकाशात हातागळे, राहुल गायकवाड व समाज बांधव उपस्थित होते.

# ’व्हीपीके’समूहाचे अध्यक्ष कवळे गुरुजी यांची हरडफ येथे भेट; ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी साधला संवाद

दैनिक वादळ वार्ता

**हदगाव । प्रतिनिधी**

व्हीपीके (तझघ) समूहाचे अध्यक्ष श्री मारोतराव पाटील कवळे (गुरुजी) यांनी आज हरडफ गावाला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधत आगामी गळीत हंगामाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा केली.

स्पर्धात्मक दराचे आश्वासन

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कवळे गुरुजी यांनी आपल्या कारखान्यास ऊस पुरवठा करण्याचे आवाहन केले. परिसरातील इतर साखर कारखान्यांच्या तुलनेत ऊसाला योग्य आणि स्पर्धात्मक बाजारभाव दिला जाईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. कारखान्याद्वारे शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

वाहतूक व्यवस्थेवर भरकेवळ ऊस उत्पादकच नव्हे,



तर ऊस वाहतूक ठेकेदारांशीही (ट्रान्सपोर्टर्स) कवळे गुरुजींनी यावेळी स्वतंत्रपणे संवाद साधला. ऊस तोडणी आणि वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि सुरळीत कशी राहील, यावर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

लवकरच भव्य सभेचे आयोजन

गावातील या भेटीनंतर लवकरच हरडफ येथे कवळे गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली एका भव्य सभेचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या सभेच्या माध्यमातून समूहाच्या आगामी प्रकल्पांची आणि शेतकरी हिताच्या योजनांची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

मान्यवरांच्या हस्ते सत्कार

हरडफ येथे आगमन झाल्यानंतर गावकरी आणि मान्यवरांच्या वतीने कवळे गुरुजी व त्यांच्या सहकाऱ्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी:

* पंजाबराव पाटील हरडफकर
* बालाजीराव पाटील सूर्यवंशी (अध्यक्ष)
* शेषेराव पाटील! शुदन शेतकरी गावकरी! भास्कर सूर्यवंशी बालाजी मोरे अविनाश मोरे पांडुरंग सूर्यवंशी राजू चव्हाण उतमराव शिंदे कानबाराव सुर्यवंशी सदाशिव सुर्यवंशी वैभव सुर्यवंशी बालाजी शिंदे विनायक पारवेकर संतोष जाधव विष्णू मोकळे बाबुराव चव्हाण

यांच्यासह गावातील प्रमुख नागरिक आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. या भेटीमुळे हरडफ परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण; मुलगी सुखरूप १९ तासांत आरोपी जेरबंद

दैनिक वादळ वार्ता

**जळगाव । जितु इंगळे**

रावेर .खिरोदा प्र. येथील १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याच्या प्रकरणात रावेर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने तत्पर कारवाई करत अवघ्या १९ तासांत आरोपीला जेरबंद केले असून मुलीची सुखरूप सुटका करण्यात आली आहे.दि. २८ मार्च रोजी सकाळी सुमारे ११ वाजेच्या सुमारास गावातीलच एका इसमाने अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याची तक्रार रावेर पोलीस स्टेशनला प्राप्त झाली. त्यानुसार रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३२/२०२६ भा.न्या. संहिता कलम १३७ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकाला तपासाच्या सूचना दिल्या.पथकाने आरोपीचा शोध घेण्यासाठी गोपनीय माहिती संकलनासोबतच सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. मात्र सुरुवातीला कोणतीही ठोस माहिती मिळत नव्हती, अखेर तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा माग काढण्यात यश आले. या तपासादरम्यान आरोपी शुभम अनिल पाटील (रा. खिरोदा, ता. रावेर) याला भिकनगाव, जि. खरगोन (मध्य प्रदेश) येथून अटक करण्यात आली.आरोपीकडून चौकशी केली असता त्याने पीडित मुलीला जवळच एका खोलीत ठेवल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनीतातडीने मुलीची सुटका करून तिला सुखरूप रावेर पोलीस ठाण्यात आणले.ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, तसेच पोलीस उपअधीक्षक अनिल बडगुजर (फैजपूर विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल, पोलीस उपनिरीक्षक सुनिल मोरे, हेडकॉन्स्टेबल समाधान ठाकुर, तसेच गुन्हे शोध पथकातील श्रीकांत चव्हाण, प्रमोद पाटील, सुकेश तडवी आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल उषा मशाने यांनी सहभाग घेतला. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन करीत आहेत.

# तुलसी महाविद्यालयात भारतीय ज्ञान प्रणाली आणि संशोधन विषयावर ऑनलाईन चर्चासत्र संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे आयोजित एक दिवसीय ऑनलाईन चर्चासत्र शनिवारी उत्साहात संपन्न झाले. ‘भारतीय ज्ञान प्रणाली, बौद्धिक संपदा अधिकार आणि संशोधन पद्धती’ या विषयांवर हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. योगिता लांडगे यांनी प्रास्ताविकातून चर्चासत्राच्या आयोजनामागील उद्दिष्ट स्पष्ट केले. यानंतर डॉ. विकास वाघमारे यांनी मान्यवर वक्ते व सहभागींचे मनःपूर्वक स्वागत केले.

चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात मुंबई येथील अमिटी युनिव्हर्सिटीचे डॉ. बाबासाहेब जोगदंड यांनी ‘डिजिटल युगातील भारतीय ज्ञान प्रणाली’ या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी सांस्कृतिक पर्यटन व वारसा शिक्षणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून परिवर्तन कसे घडवता येते, याबाबत सविस्तर विवेचन केले.

दुसऱ्या सत्रात छत्तीसगड येथील श्री शंकराचार्य प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे डॉ. संतोष कुमार यांनी ‘संशोधन पद्धती आणि गुणात्मक डेटा विश्लेषण’ या विषयावर मार्गदर्शन करत संशोधनासाठी उपयुक्त आधुनिक साधनांची माहिती दिली.

तिसऱ्या व अंतिम सत्रात आयआयआयटी वडोदरा आंतरराष्ट्रीय दीव कॅम्पसचे डॉ. विकास कुमार यांनी ‘बौद्धिक संपदा अधिकार ’ या विषयावर भाष्य करत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीसाठी आयपीआरचे महत्त्व अधोरेखित केले.

हे चर्चासत्र यशस्वी पार पाडण्यासाठी प्राचार्य डी जी निकाळजे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी तसेच आयक्यूएसी विभागाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या ऑनलाईन उपक्रमाला विद्यार्थी व संशोधकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077